# मुंबईचे ७० टक्के पोलीस उर्मट, भ्रष्ट, माजलेले आहेत
# या पोलिसांना कुणीतरी लगाम घालण्याची वेळ आली आहे

**संपादकीय**

**जयश्री खाडिलकर-पांडेकृत**

दादर पोलीस स्टेशन, अंधेरी पोलीस स्टेशन, ठाणे पोलीस स्टेशन आणि घाटकोपर (चिरागनगर) पोलीस स्टेशन या चार पोलीस स्टेशनमध्ये गेल्या काही महिन्यांत मी स्वत: घेतलेल्या अनुभवानंतर हा अग्रलेख लिहीत आहे. पोलीस कसे वागतात हे तुम्हाला माहीत नव्हते का? असे कुणी विचारेल. होय, मला माहीत होते. पण ती ऐकीव माहिती होती. केवळ ऐकीव माहितीवर आधारित दावे करणे योग्य नाही, म्हणून आजवर लिहिले नाही. आज मात्र ठामपणे म्हणता येईल की, मुंबई पोलीस दलातील ७० टक्के पोलीस हे अत्यंत भ्रष्ट, माज आलेले आणि कायदा वाटेल तसा वाकवणारे आहेत. कुणीतरी त्यांना त्यांची जागा दाखविली पाहिजे. पोलीस हे कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी नेमलेले सरकारी नोकर आहेत याची जाण त्यांना करून द्यायला हवी. सामान्य माणसांची कुटुंब उद्ध्वस्त करण्याची अमर्याद सत्ता आपल्या हाती आल्याचा त्यांना जो माज आला आहे तो उतरवला पाहिजे. जेव्हा मी 'पोलीस' म्हणते तेव्हा त्यात महिला पोलीसही येतात. किंबहुना ज्या महिला पोलिसांकडून आपण सहानुभूतीची अपेक्षा करतो त्या बहुतांश महिला पोलिसही अत्यंत उद्धट आणि उर्मट झाल्या आहेत. या ७० टक्के भ्रष्ट, उर्मट, उद्धट आणि दादागिरी करणाऱ्या पोलिसांना सुधारले नाही तर मुंबईचा बिहार होण्यास वेळ लागणार नाही.

मला पोलिसांनी वाईट वागणूक दिली म्हणून मी हे लिहीत आहे अशी वायफळ टीका कुणी करू नये. माझं नाव सांगून कार्ड दाखविले की, पोलीस हात जोडून समोर उभे राहतात. त्यामुळे मला व्यक्तिगत त्रास होण्याचा प्रश्न नाही. पण सामान्यांना न्याय मिळावा म्हणून मी माझी ओळख उघड न करता जेव्हा पोलीस स्टेशनमध्ये जाते तेव्हा या सामान्यांना कसे वागवले जाते हे पाहून मला धक्का बसतो. मी जेव्हा ७० टक्के पोलीस भ्रष्ट आहेत असे म्हणते तेव्हा या ७० टक्क्यांत पोलीस आयुक्त पडसलगीकरही येतात. मुंबईचे पोलीस आयुक्त भ्रष्ट आहेत का? असा सवाल तुमच्या मनात आला असावा. त्याला उत्तर हेच की, होय, ते भ्रष्ट आहेत. कारण भ्रष्टाचार हा केवळ पैशांचा नसतो. बौद्धिक भ्रष्टाचार असतो. कर्तव्यात कसूर करणे हा तर फार गंभीर भ्रष्टाचार आहे. मुंबई पोलीस सामान्यांवर अन्याय आणि अत्याचार करतात याच्या सातत्याने तक्रारी होऊनही पोलीस आयुक्त पडसलगीकर हे परिस्थिती बदलण्यास कठोर पावले उचलत नसतील, नि:पक्ष चौकशी करीत नसतील तर हा पोलीस आयुक्त पडसलगीकरांचा बौद्धिक भ्रष्टाचारच आहे.

दिवंगत गृहमंत्री आर. आर. पाटील यांना भेटून एका बड्या पोलीस अधिकाऱ्याची तक्रार केली होती. आजही तो अधिकारी कमावत्या हुद्यावर आहे. हा पोलीस अधिकारी पोलीस कुटुंबातील महिलांना अपमानास्पद वागवायचा. त्या महिला कोणतीही बाब सांगायला गेल्या की, अतिशय घाणेरड्या शब्दांत त्यांच्याशी बोलायचा. या अधिकाऱ्याविरुद्ध तक्रार केली तेव्हा आर. आर. पाटील म्हणाले की, तुमच्याकडे पुरावा काय? मी म्हटलं त्या महिलांना घेऊन येते. पण त्यांचा नंतर छळ होणार नाही याची तुम्ही खात्री द्या. आर. आर. पाटलांनी विषयाला बगल देत म्हटले की, पण तो तर उत्तम अधिकारी आहे. तो असे वागूच शकत नाही. तेव्हा मी त्यांना सांगितले की, तुम्ही गृहमंत्री आहात. त्यामुळे तुमच्यासमोर सर्वजण नीटच वागतात. पण तुम्हाला खरी माहिती मिळेल याची यंत्रणा तुम्ही उभारली पाहिजे. राजा अकबराकडे बिरबल होता. छत्रपती शिवाजी महाराजांकडे बर्हिजी नाईक होते. ही यंत्रणा नसेल तर तुम्ही एका अधिकाऱ्याला दुसऱ्या अधिकाऱ्याची चौकशी करायला सांगता आणि दोघे एकमेकांवर पांघरूण घालत एकमेकांना क्लीन चिट देतात. आज दुर्दैवाने तेच सुरू आहे. सामान्य माणसाला न्याय मिळत नाही.

ठाणे पालिका आयुक्तांनी फेरीवाल्यांना, रिक्षावाल्यांना, सामान्य माणसांना मारले. यात कुणाची बाजू घ्यायचा प्रश्न नाही. पण दुसऱ्याला हात लावायचा अधिकार आयुक्तांना कुणी दिला? हे विचारायला हवे. ठाणे शहर पोलीस ठाण्यात लेखी तक्रार स्वीकारायला तयार नव्हते. त्यांचे म्हणणे ही हायप्रोफाइल व्यक्तीविरोधात तक्रार आहे. तेव्हा मुख्यालयात जाऊन तक्रार करा. ठाणे पालिका आयुक्त हा सरकारी कर्मचारी आहे. जनतेची सेवा करणे ही त्याची ड्युटी आहे. पण 'आयुक्त' म्हणजे हायप्रोफाइल आणि जनता लो प्रोफाइल? जनता म्हणजे किडा-मुंगी असा अधिकाऱ्यांचा समज झाला आहे आणि त्यांच्या दबंगगिरीमुळे जनता भयभीत झाली आहे.

दादर पोलीस स्टेशनला माजी नगरसेवकाच्या विरोधात विनयभंगाची तक्रार तीन दिवस घेतली नाही. शेवटी त्या महिला तक्रारदाराबरोबर मी गेले. तिची मैत्रीण आहे असे सांगितले तेव्हा तक्रार घेणारी महिला पोलीस म्हणते, तुमचं काय काम इथे? तुम्ही बाहेर व्हा. मी म्हटलं, मी तिची मैत्रीण आहे. तिच्याबरोबर आले. त्यावर त्या महिला पोलिसाला आणखी जोर चढला. ती खेकसत म्हणाली, बाहेर व्हा, सांगितले ना. मी बाहेर गेले. पोलीस निरीक्षकाला माझी ओळख सांगितली, मग धावाधाव झाली आणि त्या महिला पोलिसाने माझी माफी मागितली. तक्रार करणारी महिला घाबरली असेल तर तिच्याबरोबर तिच्या मैत्रिणीने थांबायचं नाही का? मैत्रिणीला तिच्याबरोबर थांबता येणार नाही असे कोणता कायदा सांगतो? पण ओळख दाखवेपर्यंत अरेरावी, दादागिरी सुरू होती. इकडे महिला सक्षमीकरणाच्या गप्पा मारायच्या आणि पोलीस स्टेशनात महिलांना अशी हीन वागणूक द्यायची. महिला जेव्हा पोलीस स्टेशनात तक्रार द्यायला जाते तेव्हा मोठी हिम्मत करून जात असते याची दखलही हे पोलीस घेत नाहीत. चार दमड्यांसाठी तिला पळवून लावतात आणि महिला सक्षमीकरणाच्या गप्पा मारतात.

अंधेरी पोलीस स्टेशनला हाच प्रकार होता. त्या महिलेची तक्रार घेण्यापूर्वी ज्याच्या विरोधात तक्रार होती त्याला फोन जात होते. हिला चौकशीला बोलवायचं आणि तासन् तास बसवून ठेवायचं हा प्रकार सुरू होता. सगळीकडे हेच सुरू आहे. एका महिलेला सासरच्यांनी वसई-विरारला मारहाण करून घराबाहेर काढले. ती अंधेरीला माहेरी आली तेव्हा तिची आई तिला तक्रार करायला पोलीस स्टेशनला घेऊन आली. तिचे लहान मूल सोबत होते, पण अंधेरी पोलीस स्टेशनवाले तक्रार न घेता तिला वसई-विरारला जाऊन तिथल्या पोलीस स्टेशनमध्ये तक्रार करायला सांगत होते. कायदा सांगतो की, महिला ज्या पोलीस स्टेशनला जाईल तिथे तक्रार घ्यायची आणि मग त्या तक्रारीची चौकशी करायला ती तक्रार संबंधित पोलीस स्टेशनला पाठवायची. पण ती महिला बिच्चारी कायदा काय सांगणार? अंधेरी पोलीस स्टेशनमध्ये पोलिसांचे गणवेश घालून बसणारे कायदा अंमलात आणत नाहीत. तक्रारदारांना वाटेल ते सांगून हाकलतात आणि जनतेने गप्प राहून सर्व सहन करायचं? याला पोलीस शासन म्हणतात?

घाटकोपर चिरागनगरला तर महिला पोलीस म्हणते की, सकाळी एकदा मारल्याची तक्रार घेतलीय ना? दुपारी पुन्हा मारले तर पुन्हा तक्रार नाही करता येत. हे काय बोलणे आहे? या महिला पोलिसाने दुसऱ्यांदा मारल्याची तक्रार घेणार नाही म्हणून त्या तक्रारदाराला चौकशी अधिकाऱ्याकडे पिटाळलं, मग चौकशी अधिकाऱ्याची अरेरावी सुरू झाली. त्यांनी तक्रारदारालाच धारेवर धरलं. ज्याच्या विरोधात तक्रार होती त्याला फोन गेले आणि त्याने उलट तक्रार केली. सगळा प्रकारच भयानक होता. तक्रारदाराला दोन दिवस त्याने केलेल्या 'एफआयआर'ची प्रत देत नव्हते. कायद्याने ही प्रत लगेच मिळायला हवी. अशा या पोलिसांच्या रॅकेटविरुद्ध सामान्य माणूस लढू शकत नाही. एखाद्याने सवाल केला तर मग त्याला सारखं चौकशीला बोलवून चार-चार तास बसवून ठेवायचं, त्याच्या घरी पोलिसांना घेऊन जायचं असा छळ सुरू होतो. मुंबईतील बहुसंख्य पोलीस स्टेशनात हीच परिस्थिती आहे. इथे अराजक माजले आहे. काही पोलीस इमानदार आहेत म्हणून मुंबईने तग धरला आहे, नाहीतर गुंडगिरीची सुनामी आली असती.

आजच्या या परिस्थितीला सर्वाधिक जबाबदार पोलीस आयुक्त पडसलगीकर आहेत. ते माणूस म्हणून स्वच्छ चरित्र, मृदू बोलणे, आदबशीर आहेत. मात्र नुसतं चांगलं असून उपयोग नाही. आयुक्त कर्तबगार असायला हवा. त्यांची जरब असायला हवी. पण तसे चित्र नाही. आयुक्त चांगला, पण पोलीस स्टेशनात अंदाधुंदी असे वास्तव आहे. या पोलिसांना कुणीतरी लगाम घालण्याची वेळ आली आहे.